मराठी न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# गर्भाशयाच्या फायब्रॉईड्समुळे वाढत्या वंध्यत्वाच्या समस्या

## गर्भाशयाच्या फायब्रॉईड्समुळे वंध्यत्वात वाढ : प्रजनन वयोगटातील 60 टक्के महिलांना त्रास

**पिंपरी | प्रतिनिधी**

सध्या धकाधकीचे जीवन ताणतणाव, बदलती जीवनशैली, व्यायामाचा अभाव, अन् उशिरा लग्न उशिरा प्रेग्नेंसी प्लॅनिंग यामुळे महिलांना वंध्यत्वाच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रजनन वयोगटातील ६० टक्के महिलांना गर्भाशयाच्या फायब्रॉइड्सची समस्या सतावत असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले आहे. दरदिवशी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या १० पैकी दोन महिलांना फायब्रॉईडसची समस्या असल्याचे समोर आले आहे. त्यामध्ये अविवाहीत मुलींचाही समावेश आहे.

वैद्यकीय अहवालांनुसार १८ ते ३५ वयोगटातील महिलांमध्ये गर्भाशयाच्या फायब्रॉईड्सचे प्रमाण वाढले आहे. या सौम्य ट्यूमरमुळे तीव्र वेदना, मासिक पाळीत अधिक रक्तस्राव आणि बहुतांश प्रकरणांमध्ये प्रजनन समस्या उद्भवू शकतात. महिलांना मासिक पाळीत जास्त रक्तस्राव होणे, ओटीपोटात वेदना होणे किंवा गर्भधारणेत अडचणी येणे यांसारखी लक्षणे दिसल्यास वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे.



### लक्षणे

गाठी कुठं नि किती आहेत, त्यांचा आकार केवढा आहे यावर लक्षणं अवलंबून आहेत. काही स्त्रियांमध्ये तर लक्षणं आढळतंच नाहीत. तरीही बहुसंख्य स्त्रियांना जी लक्षणं जाणवतात ती अशी -

मासिक पाळीदरम्यान अतिरक्तस्राव व प्रचंड वेदना

कंबरदुखी नि पायांमध्ये वेदना

मासिकपाळीच्या दिवसांमध्ये वाढ

बद्धकोष्ठता

ओटीपोटात भरून येणं

वंध्यत्व



“ फायब्रॉईड म्हणजे काय तर ही गर्भाशयाची कर्करोग नसलेली वाढ आहे. ते प्रजनन आरोग्याच्या समस्येस कारणीभूत ठरते. फायब्रॉईड्स हे फॅलोपियन ट्यूब ब्लॉक करतात. ज्यामुळे शुक्राणूंना स्त्री-बीजापर्यंत पोहोचणे आणि ते फलित करणे अवघड होते. ही समस्या नैसर्गिकरित्या गर्भधारणेच्या क्षमतेमध्ये अडथळा आणू शकते आणि गर्भपाताचा धोका निर्माण करू शकते. त्यामुळे १५ वर्षांवरील मुलींनी नियमितपणे स्त्री-रोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. फायब्रॉइड्सची स्थिती उद्भवण्यानं भिण्याचं कारण नाही. त्यासाठी योग्य औषधोपचार नि शस्त्रक्रिया उपलब्ध आहेत. करायचं ते इतकंच की लक्षणांवर लक्ष ठेवायचं नि योग्य वेळेत वैद्यकीय सल्ला घ्यायचा! सध्याच्या काळात उशिराने लग्न, उशिराने प्रेगन्सी त्यामुळे महिलांना अडचणी येत आहेत. वयाच्या तीसनंतर प्रेग्नंसी प्लॅन करणाऱ्या महिलांना अशा अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे महिलांना वयाच्या तीसमध्ये सोनोग्राफी करावी, त्रास होण्याआधीच फाईब्रॉईड काढावे.

- डॉ. केदार मराठे (स्त्रीरोगतज्ज्ञ)



“ फायब्रॉईड्समुळे अनेकदा यशस्वी गर्भधारणेत अडचणी येऊ शकतात. फायब्रॉईड्स असलेल्या महिलांना त्वरित उपचार घेता येतात; मात्र यासाठी महिलांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. गर्भाशयाच्या फायब्रॉड्सचे प्रमाण तरुणींमध्ये अधिक दिसून येते. यास पर्यावरणीय घटकही तितकेच कारणीभूत ठरतात, कारण काही प्रदूषक आणि रसायनांच्या संपर्कात आल्याने लहान वयातच फायब्रॉईड विकसित होऊ शकतात. तसेच ताण, वाढते वजन, वय याचाही संबध फायब्रॉईडस्शी येतो.काही महिलांमध्ये हार्मोन्सच्या परिणामामुळे गर्भाशयाच्या स्नायूंच्या ऊतींची वाढ होते आणि त्यामुळे फायब्रॉईड्स तयार होतात. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या १० पैकी दोन महिलांना फायब्रॉईड्सची समस्या आढळून येते. रजोनिवृत्तीनंतर ते आकाराने लहान होतात. त्याचप्रमाणे जेव्हा शरीरात इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉनचे प्रमाण जास्त असते, तेव्हा गर्भधारणेदरम्यान त्यांचा आकार वाढतो.

- डॉ. रविंद्र शेलमोहकर (स्त्रीरोगतज्ज्ञ)

### शस्त्रक्रिया

» **मायोमेक्टमी : निरोगी पेशींना धक्का न लावता फायब्रॉइड्स काढून टाकण्याची ही शस्त्रक्रिया.**

» **हिस्टरेक्टमी : गाठी खूपच मोठ्या असतील तर थेट गर्भाशय काढून टाकण्याची ही शस्त्रक्रिया.**

» **मायोलेसिस : इलेक्ट्रिक करंट किंवा लॅप्रोस्कोपीद्वारे गाठीत सुई टोचून त्या नाहीशा करण्याची शस्त्रक्रिया**

» **एन्डोमेट्रियल ॲब्लेशन : लेसर, वायर लूप, मायक्रोवेव्ह, गरम पाणी वा अन्य पद्धती वापरून गाठी काढल्या जातात. शस्त्रक्रिया करताना रक्तस्राव होऊ नये म्हणून गर्भाशयाची लायनिंग काढली जाते.**

# आधार ज्येष्ठ नागरिक संघाचा वर्धापनदिन उत्साहात संपन्न

## दुसऱ्या वर्धापनदिनानिमित्त ‘जाने कहाँ गये वो दिन...’ या सांगीतिक मैफलीचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

“ए शाम मस्तानी...” अशा जुन्या हिंदी – मराठी सदाबहार चित्रपटगीतांच्या साभिनय सादरीकरणातून ज्येष्ठांनी आपल्या चिरतारुण्याचा प्रत्यय बुधवार, दि. ०१ जानेवारी २०२५ रोजी ठाकरे मैदान, यमुनानगर, निगडी येथील रसिकांना दिला. आधार ज्येष्ठ नागरिक संघाच्या दुसर्या



वर्धापनदिनानिमित्त ‘जाने कहॉं गये वो दिन...’ या सांगीतिक मैफलीचे आयोजन करण्यात आले होते, त्याला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

याप्रसंगी माजी नगरसेवक उत्तम केंदळे, माजी नगरसेविका सुलभा उबाळे, सुमन पवळे, कमल घोलप, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा आढी, गिरीश देशमुख, आधार ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नारायण पाटील, उपाध्यक्ष भानुदास कदम, सचिव कचरू जगदाळे, सहसचिव माणिकराव माने, खजिनदार श्रीकृष्ण पुरोहित, सहखजिनदार बाळकृष्ण ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुलभा उबाळे यांनी आपल्या मनोगतातून, “माणूस वयाने ज्येष्ठ होतो पण मनाने तरुण असतो, याचा येथे अनुभव घेतला. स्थानिक कलाकारांना नेहमी प्रोत्साहन दिले पाहिजे” असे आवाहन केले. अण्णा आढी यांनी, “कलेला उत्तेजन हे ज्येष्ठांसाठी टॉनिक आहे” असे मत व्यक्त केले.

तसेच वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ सभासदांचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला.

# पुणे जिल्हाधिकारी पदी जितेंद्र डूडी रुजू

## जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांची सातारा जिल्हाधिकारीपदी नियुक्ती

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हाचे मावळते जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी जितेंद्र डूडी यांचे स्वागत करून त्यांच्याकडे जिल्हाधिकारी पदाचा पदभार सोपवला.

जिल्हाधिकारी डुडी यांनी यापूर्वी सन २०१९ मध्ये सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय तळोदा, नंदूरबार, सन २०१९ ते २०२० या कालावधीत सहायक जिल्हाधिकारी मंचर तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय घोडेगाव, पुणे तर सांगली जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सातारा जिल्हाधिकारी या पदावर काम केले आहे.



जितेंद्र डूडी यांच्या सेवा कालावधीत पोषण अभियानांतर्गत ५ व्या राष्ट्रीय पोषण महिन्यात अधिकाधिक उपक्रम राबवून उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल राज्यात तृतीय पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच राष्ट्रीय मतदान दिन २०२४ च्यावेळी पुणे विभागात उत्कृष्ट जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून प्रथम पुरस्कारानेही त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

जितेंद्र डूडी यांनी २०१९ मध्ये महाराष्ट्रातील नंदूरबार जिल्ह्यात आदिवासी प्रकल्प अधिकारी म्हणून काम केल्यानंतर २०१९-२० मध्ये पुणे जिल्ह्यातील मंचर घोडेगाव येथे आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यानंतर सांगलीच्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. त्यानंतर गेल्या दीड वर्षापासून डुडी हे सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून काम पाहत होते. गेल्या वर्षीच्या झालेल्या निवडणुकांमध्ये सर्वोत्कृष्ट जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून पुणे विभागात डुडी यांना सन्मानित करण्यात आले होते.

संतोष पाटील यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार सायंकाळी सोडून तो अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांच्याकडे दिला होता. त्यानंतर अवघ्या तासाभरातच गजानन पाटील यांच्या नियुक्तीचे आदेश जारी केले. राज्य सरकारच्या महसूल सेवेतील असलेले गजानन पाटील यांनी पुणे जिल्ह्यामध्ये जुन्नर प्रांताधिकारी म्हणून काम केले आहे. त्याचबरोबर एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी म्हणूनही ते पुण्यात कार्यरत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे खासगी सचिव म्हणून त्यांनी मंत्रालयात प्रदीर्घ कारकीर्द केली. गुरुवारी त्यांची पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.

दिवसे यांची गेल्या वर्षी ८ फेब्रुवारीला पुण्याच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली होती. जिल्हाधिकारीपदी दिवसे हे प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकर प्रकरणामुळे देशभर चर्चेत आले होते. त्यांच्या ११ महिन्यांच्या कार्यकाळात लोकसभा व विधानसभा निवडणुका शांततेत पार पडल्या. राज्य सरकारने दिवसे यांना पदोन्नती देत रिक्त असलेल्या राज्याच्या जमाबंदी आयुक्त तसेच भूमी अभिलेख विभागाच्या संचालकपदी नियुक्ती केली आली आहे.

पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांची सातारा जिल्हाधिकारीपदी नियुक्ती केली आहे. त्यांची नियुक्ती डुडी यांच्या जागी करण्यात आली आहे; तर मंत्रालयातील अतिरिक्त जिल्हाधिकारी गजानन पाटील यांची मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. तत्पूर्वी संतोष पाटील यांनी आपला कार्यभार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांच्याकडे सोपविला आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन तसेच पुष्पहार अर्पन करून अभिवादन

**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय खराळवाडी, पिंपरी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) च्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनानिमित्ताने शहराध्यक्ष योगेश मंगलसेन बहल तसेच महिला अध्यक्षा प्रा.कविता आल्हाट तसेच शहरातील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन तसेच पुष्पहार अर्पन करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी शहराध्यक्ष योगेश बहल आपल्या भाषणात म्हणाले की, सावित्रीबाई फुले या महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहीशी करण्यासाठी काम केले आहे. शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे गरजेचे आहे, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे सावित्रीबाईंनी ओळखून त्या काळातील समाजातील कठीण परिस्थितीत स्त्री शिक्षण किती गरजेचे व महत्वाचे आहे हा संदेश पोहचविण्याकरिता त्यांनी मुलींची पहिली शाळा सुरू करून काही क्रूर रूढींना सामोरे जात सावित्रीबाईंनी आपले पती ज्योतीराव फुले यांच्या सहकार्याने मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा धाडसी निर्णय घेतला. सावित्रीबाई या एक लेखिका देखील होत्या, त्यांची काव्यफुले, सुबोध रत्नाकर, बावनकशी अशी विविध पुस्तके देखील प्रकाशित असून त्यांनी मराठी भाषेत लेखन केलेलं आहे. ०३ जानेवारी हा दिवस बालिका दिन म्हणूनही साजरा केला जातो, हा दिवस स्त्री सक्षमीकरणासाठी नवा संकल्प करण्याचा दिवस आहे.

आपण सर्वांनी सावित्रीबाईंच्या विचारांचा आदर ठेवून मुलींसाठी एक सुरक्षित आणि शिक्षण संपन्न भविष्य घडवावे याकरिता त्यांच्या जयंती दिवशी त्यांचे स्मरण करून समाजासाठी कार्य करण्याचा आपण संकल्प करूया, त्यांच्या पवित्र स्मृतीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा)च्यावतीने अभिवादन करतो. यावेळी महिला अध्यक्षा प्रा.सौ.कविता आल्हाट यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी शहराध्यक्ष योगेश मंगलसेन बहल, महिला अध्यक्षा प्रा.कविता आल्हाट, माजी सभापती विजय लोखंडे, युवक अध्यक्ष शेखर काटे, विद्यार्थी अध्यक्ष चेतन दुधाळ, प्रदेश उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कांबळे, महिला वरिष्ठ कार्याध्यक्ष कविता खराडे, व्हीजेएनटी सेल अध्यक्षा निर्मला माने, सुप्रिया सोळांकुरे, शहर उपाध्यक्ष तुकाराम बजबळकर, माऊली मोरे, शहर चिटणीस राजेंद्र म्हेत्रे, महेश ताकवले, धनाजी तांबे, सुनिल आडागळे इत्यादी मान्यवरांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थितीत होते.

# शाळांना दिली अग्निशामक सुरक्षेची जबाबदारी

## शाळांना अग्निशामक सुरक्षा प्रमाणपत्राची पूर्तता करण्यासाठी पत्रव्यवहार केला जाणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगीच्या वाढत्या घटना लक्षात घेऊन शहरातील शाळांमध्ये अग्निशामक सुरक्षेची पूर्तता होते की नाही, हे पाहिले जाणार आहे. त्यासाठी महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून अग्निशामक सुरक्षा प्रमाणपत्राची पूर्तता करण्यासाठी ६७३ शाळांना पत्र पाठविण्यात येणार आहेत. ज्या शाळांकडून सुरक्षाविषयक पूर्तता केली जाणार नाही. त्यांना अग्निशमन विभागाकडून नोटीस बजावण्यात येणार आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील रुग्णालयांपाठोपाठ शाळांमध्ये अग्निसुरक्षेची काय व्यवस्था आहे, याची तपासणी अग्निशमन दलाकडून केली जाणार आहे. या कार्यवाहीचा पहिला टप्पा म्हणून शाळांना अग्निशामक सुरक्षा प्रमाणपत्राची पूर्तता करण्यासाठी पत्रव्यवहार केला जाणार आहे. त्यानंतर संबंधितांना त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यासाठी १५ दिवसांची मुदत दिली जाईल.

या मुदतीमध्ये त्यांनी आगीपासून सुरक्षेसाठी आवश्यक उपकरणे व अन्य बाबी बसविणे, बसविलेली उपकरणे सुस्थितीत आहेत का, याची तपासणी करणे गरजेचे आहे. शाळांना दिलेली मुदत संपल्यानंतर त्यांना प्रत्यक्ष नोटिसा बजावल्या जाणार आहेत. त्यानंतरही शाळांकडून याबाबत दुर्लक्ष करण्यात आल्यास 'अग्निसुरक्षा अधिनियम-२००५' नुसार संबंधित शाळांविरोधात अग्निशमन दलाकडून कार्यवाही केली जाणार आहे.

महापालिका अग्निशमन दलाने आत्तापर्यंत अग्निसुरक्षा प्रमाणपत्रासाठी शहरातील विविध ३ हजार ८१२ आस्थापनांना नोटिसा बजावल्या आहेत. ४८२ आस्थापनांची अग्निशमन दलाच्या पथकाकडून प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. तर १७२ जणांना व्यवसाय अग्निसुरक्षा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. शाळांनादेखील याची पुर्तता करावी, हे आवाहन महापालिका अग्निशमन विभागाकडून करण्यात येत आहे.

> “ पिंपरी-चिंचवडमध्ये सातत्याने आगीच्या घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर आयुक्तांच्या सूचनेनुसार शाळांमध्येदेखील अग्निसुरक्षेला महत्त्व देणे आवश्यक आहे. त्याकरिता शाळांनी अग्निशामक सुरक्षा प्रमाणपत्र पत्र घेतले आहे किंवा नाही, याची तपासणी केली जात आहे. त्यासाठी पुढील आठवडाभरात शाळांना पत्र पाठविण्यात येणार आहे.
>
> **- मनोज लोणकर, उपायुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# लोखंडी जाळ्यांमुळे गुदमरतोय झाडांचा श्वास

## चिंचवड मतदार संघातील विविध विकासकामांना गती देण्यासाठी घेतली बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभेचे नागपूर हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर भाजपचे शहराध्यक्ष व चिंचवडचे आमदार शंकर जगताप ‘ॲक्शन मोड’वर असल्याचे पाहायला मिळत आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील विकासकामे आणि मूलभूत सुविधांशी संबंधित अडचणींवर चर्चा करण्यासाठी त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त व प्रशासक शेखर सिंह यांच्या समवेत एक महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीला चिंचवड मतदारसंघातील माजी नगरसेवक देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> “ चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या प्रलंबित विकासकामांना गती देऊन नागरिकांना मूलभूत व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधींनी सक्रिय भूमिका घेण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला.
>
> **- शंकर जगताप, आमदार, चिंचवड .**

# केवळ 74 सीसीटीव्हीवर रेल्वे स्थानकाची भिस्त

## महापालिकेच्या मिळकतकराची थकबाकी भरण्याकडे दुर्लक्ष करणे पुणेकरांना चांगलेच भोवणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे रेल्वे स्टेशनवर अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी मंजुरी मिळून नऊ महिने होऊन गेले तरी अद्याप सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले नाहीत. त्याची निविदानंतरची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे पुणे रेल्वे स्टेशनची सुरक्षा भक्कम कधी होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### केवळ 74 सीसीटीव्ही कॅमेरे

» पुणे रेल्वे स्टेशन येथे सध्या ७४ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत. ते बसवूनदेखील काही वर्षे उलटली आहेत. त्यामुळे नव्याने ४६ सीसीटीव्ही बसविण्याचा निर्णय झाला आहे. यामध्ये आरोपींचा चेहरा ओळखतील असे सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. गेल्या दीड ते दोन वर्षांपासून सीसीटीव्ही बसविण्याची चर्चा सुरू आहे. आता सीसीटीव्ही बसविण्यास मंजुरी मिळाल्याचे मार्च महिन्यातच रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले होते. पण, अद्याप तरी पुणे रेल्वे स्टेशन परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसलेले नाहीत.

### स्थानकावरील स्थिती

- » दैनंदिन प्रवासी संख्या - दीड लाख
- » ये-जा करणाऱ्या गाड्या - २००
- » पुण्यातून सुटणाऱ्या गाड्या - ७२
- » एकूण सीसीटीव्ही संख्या - ७४
- » नवीन प्रस्तावित सीसीटीव्ही

---

# द्राक्षांचा हंगाम यंदा उशिरानेच

## द्राक्ष उत्पादनाला पावसाचा फटका : पाऊस लांबल्याने महिनाभर विलंबाने बाजारात आवक

**पुणे | प्रतिनिधी**

द्राक्ष उत्पादनाला यंदा लांबलेल्या पावसाचा फटका बसला आहे. एक महिना विलंबाने हंगाम सुरू झाला आहे. मार्केट यार्डातील फळ विभागात तुरळक आवक सुरू झाली आहे. एप्रिलपर्यंत हंगाम सुरू राहणार असल्याची माहिती व्यापारी अरविंद मोरे यांनी दिली.

### पर्यटन स्थळांहून मागणी

» बाजारात दाखल होणाऱ्या द्राक्षांना मोठा उठाव आहे. सध्या नववर्ष स्वागतासाठी पर्यटकांनी पर्यटन स्थळी गर्दी केली आहे. त्यामुळे गोवा, लोणावळा, माथेरान, महाबळेश्वर, वाई, पाचगणीसह विविध पर्यटनस्थळांहून मागणी आहे. याबरोबरच स्थानिक बाजारपेठांसह गुजरात, बंगळुरू, कोलकाता येथून द्राक्षांना मोठी मागणी आहे.

> दर्जेदार मालाला शेतातच मागणी आहे. मात्र, हा माल बाजारात आल्यास त्याला किलोमागे ५ ते १० रुपये जास्त भाव मिळू शकतो. तसेच, बाजार समितीच्या अखत्यारित माल आल्याने शेतकऱ्यांचे पैसे बुडण्याची शक्यता नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी बाजार आवारातच माल विक्रीसाठी आणावा.
>
> **- अरविंद मोरे, द्राक्षांचे व्यापारी, मार्केट यार्ड.**